**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १८९/२०१६ मधील नि.६७ खालील आदेश</u>**
**<u>शंकर ससे वगैरे वि. निवृत्ती चोरमाले वगैरे</u>**
**<u>CNR NO. MHST050005782016</u>**

प्रतिवादी याने सदरचा अर्ज जादा मुद्दे काढण्याबाबत दाखल केला आहे.

०२. वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द निरंतरचे ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. मे. न्यायालयाने नि.२२ वर दि.२३.०८.२०१८ रोजी मुद्दे काढलेले आहेत. वादी यांनी दावा कलम १ब ही मिळकत दि.१३.०१.१९९७ रोजी व दावा कलम १क ही मिळकत दि.२९.०५.२००१ रोजी खरेदी घेतल्याची विधाने केलेली आहेत. सदर खरेदीपत्रा आधारे मालकी हक्काची कब्जे वहिवाट नमूद केलेली आहे व त्यास अनुसरून निरंतर ताकीद मागितलेली आहे. वर नमूद विधानांप्रमाणे जादा मुद्दे निघणे आवश्यक आहे. म्हणून प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. वादी यांनी नि.७० वर म्हणणे दाखल करुन सदर अर्जास हरकत घेतली आहे. वादींचे कथनानुसार, दावा कलम १ब व १क या मिळकतीचे खरेदीपत्रास अनुसरुन प्रतिवादी यांनी नि.१८ चे कैफीयतीत कलम १० मध्ये वादी हे सदर वाद मिळकतीत ति–हाईत इसम खरेदीदार आहेत असे स्पष्ट कबूल करुन काही मजकुर खोटा कथन केला आहे. यानुसार प्रतिवादीस वादीचे खरेदीपत्रास पुन्हा हरकत घेण्याचे कारण नाही. केवळ दाव्याचे निर्णयास विलंब व्हावा या हेतूने प्रतिवादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द

निरंतरचे ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी खालीलप्रमाणे नि.२२ वर दि.२३.०८.२०१८ रोजी मुद्दे काढलेले आहेत.

१. वादींनी ते वाद मिळकतीच्या कायदेशीर मालकी वहिवाटीत असल्याचे शाबीत केले आहे काय ?

२. दाव्यास कारण घडलेले आहे काय ?

३. वादी मागणीप्रमाणे दाद मिळण्यास पात्र आहेत काय ?

४. काय आदेश व हुकूमनामा ?

सदर मुद्यांमध्ये वादीच्या मालकीबाबत मुद्दा क्र.१ काढलेला आहे. प्रतिवादीने कैफीयतमध्ये वादी हे ति–हाईत खरेदीदार इसम आहेत असे मान्य केले आहे. त्यामुळे जादा मुद्दा काढण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2025.10.10 10:45:58 +0530

( जे.जे.माने )

ठिकाणः कराड

दिनांकः ०९.१०.२०२५

४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.